# इयत्ता १ ली – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| अभिवादन | **शिक्षक-शिक्षिका** विद्यार्थ्यांनी माध्यमभाषेतून केलेल्या अभिवादनाचा स्वीकार करणे, कौतुक करणे. त्यांना मराठीतून करावयाच्या अभिवादनाचा परिचय करून देणे व तशी कृती करून दाखविणे. | शिक्षिका वर्गात येताच त्यांना माध्यमभाषेतून अभिवादन करणे.<br><br>शिक्षिकांनी केलेल्या अभिवादनाचा उच्चार आणि कृती यांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणे. | मराठीतून अभिवादन करण्याच्या पद्धतींची व उद्‌गारांची माहिती होते. | नव्या माहितीचा आनंद होतो. | घरातील व्यक्तींना माहिती देतात. मराठीतून अभिवादन करतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | नंतर वर्गाकडून मराठी अभिवादनाचा उच्चार करवून घेणे.<br>त्यानंतर गटांत एकमेकांना अभिवादन करण्याचा सराव करवून घेणे. | शिक्षिकांच्या मागोमाग योग्य प्रकारे उच्चार करणे.<br>गटात एकमेकांना मराठीतून अभिवादन करणे. | | | | निरीक्षण व नोंद |
| | विद्यार्थ्यांच्या घरी अभिवादन करण्याची वेगळी पद्धत आहे का असे विचारून वेगळ्या पद्धतीचा वर्गाला परिचय करवून देणे. | अभिवादनाच्या वेगळ्या पद्धतीचे निरीक्षण करणे. | अभिवादनाच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी त्यातून आदर व्यक्त होतो हे कळते. | ज्येष्ठ व्यक्ती, समवयस्क यांच्याबद्दल आदर व्यक्त करतात. | वर्गाला भेट देणारे पाहुणे, क्षेत्रभेटीत अन्य व्यक्ती यांना मराठीतून अभिवादन करतात. | — |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| खेळ–सूचनापालन | सूचनेनुसार कृती करण्याच्या खेळाचे स्वरूप समजावून सांगणे, प्रात्यक्षिक दाखविणे. उदा. कृतींसह – उठा, बसा, हसा, रडा, पळा, थांबा इ. | शिक्षिका घेत असलेल्या प्रात्यक्षिकांचे निरीक्षण करणे. कृतींच्या आधारे खेळातील सूचना समजून घेणे. | शब्द व कृती यातील साधर्म्य लक्षात येते. | वर्गमित्रांबरोबर कृती करण्याची मजा अनुभवतात. | सूचनेप्रमाणे कृती करतात. | – |
| ध्वनी–भेद | घंटा, घुंगरू, दूरध्वनी तसेच भ्रमणध्वनीवरील संकेतध्वनिमालिका यांचे प्रत्यक्ष ध्वनिमुद्रित आवाज ऐकवून ते ओळखण्यास सांगणे. | आवाज लक्षपूर्वक ऐकणे व त्याच्याशी साहचर्य असलेल्या वस्तूंची नावे सांगणे. त्या आवाजाची नक्कल करणे. | ध्वनींचे उच्चारण योग्य तऱ्हेने कसे करायचे ते कळते. | उच्चारणाची मजा घेतात. | ध्वनी–भेद लक्षात घेऊन उच्चारण करतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| पक्षी व त्यांचे आवाज | विद्यार्थ्यांना मैदानात घेऊन जाणे. नवा खेळ समजावून सांगणे. पक्ष्यांची चित्रे ओळखून घेणे. त्यांची मराठी नावे सांगणे. पुनरावृत्ती करून घेणे. | शिक्षिका बोलत असताना परिचित शब्द ऐकण्याचा प्रयत्न करणे. पक्षी ओळखणे, त्यांची माध्यमभाषेतील नावे सांगणे. त्यांची मराठीतील नावे लक्षात ठेवणे, उच्चारणे, पुनरावृत्ती करणे. | कृती आणि संबंधित सूचना यांचे संबंध लक्षात येतात.<br><br>धारणा आणि साहचर्य यांच्या मदतीने पूर्वानुभव आठवतात. | खेळाचा आनंद घेतात. | मराठीतून सूचना देत परिसरातील मित्रांबरोबर हा खेळ खेळतात. | निरीक्षण व नोंद |
| | एकेका पक्ष्याचा कटआऊट दाखवीत त्याचा आवाज काढण्यास सांगणे. विद्यार्थी तसे करू शकले नाहीत तर स्वतः ते आवाज काढून दाखविणे अथवा | पक्षी आणि त्याचा आवाज लक्षात ठेवणे.<br><br>आवाजाची नक्कल करण्याचा प्रयत्न करणे. | माध्यमभाषा आणि मराठीतील पक्षी यांची पर्यायी नावे लक्षात राहतात. | पक्ष्यांची मराठी नावे ऐकून गंमत वाटते. | वेगवेगळे आवाज ऐकून ते कशाचे आहेत ते ओळखण्याचा खेळ खेळतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | ध्वनिमुद्रित आवाज ऐकविणे. त्यांच्याकडून पुनरावृत्ती करवून घेणे. | | | | मित्रांना परिसरातील पक्ष्यांची नावे सांगून त्यांचे आवाज काढून दाखवितात. | |
| पशू व वाहने यांचे आवाज | वरीलप्रमाणे पशू व वाहने ओळखण्याचा व त्यांचे आवाज काढण्याचा खेळ खेळण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे. | पक्ष्यांसंबंधात केलेल्या कृतींप्रमाणे याही वेळी कृती करणे. | पशूंचे, वाहनांचे आवाज साहचर्याने लक्षात राहतात. विशिष्ट आवाज काढण्यासाठी तोंडातल्या कोणत्या भागाचा उपयोग होतो ते कळते. | पशूंचे, वाहनांचे आवाज काढण्याचा आनंद लुटतात. | | निरीक्षण व नोंद |
| बडबडगाणी | हावभावासहित बडबडगाणी म्हणून दाखविणे. नंतर एकेक ओळ स्वतः म्हणून विद्यार्थ्यांकडून पाठोपाठ म्हणवून घेणे. | लक्षपूर्वक ऐकणे, निरीक्षण करणे. शिक्षिकांचे अनुकरण करणे. | बडबडगाण्याचा ठेका आणि परत परत ऐकू येणारे ध्वनी यांची गंमत लक्षात राहते. | नवे गाणे शिकल्याचा आनंद घेतात. | घरी गाणी म्हणून दाखवितात. | तोंडी चाचणी (बडबडगाणी) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| आकारभेद | विद्यार्थ्यांना गटात विभागून त्यांना पक्षी, पशू अथवा वाहन यांची बिंदूंनी तयार केलेली चित्रे जोडून रंगविण्यास सांगणे. | चित्रे जोडणे व रंगविणे | – | चित्रे जोडून रंगविण्याचा आनंद घेतात. | | |
| नामपट्ट्या | विद्यार्थी बिंदू जोडत आणि चित्रे रंगवीत असताना एकेका गटात जाऊन त्यातील एकेका विद्यार्थ्याचे नाव विचारून ते सर्वांसमोर कार्डावर लिहिणे व त्याच्याकडून पाच ते सहा वेळा म्हणवून घेणे. (सर्व गटातील | स्वतःचे नाव आणि गटातील मित्रांची नावे कशी लिहिली जातात याचे निरीक्षण करणे. आपले नाव व आपल्या मित्राचे नाव लक्षात ठेवण्यासाठी पुन्हा पुन्हा म्हणणे. | | आपण एवढी नावे वाचू शकलो, याचा अभिमान वाटतो. | वर्गासमोर आपापल्या गटातील जास्तीत जास्त मित्रांची व चित्रांची नावे वाचून दाखवितात. | तोंडी चाचणी (नामपट्ट्यांचे वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | विद्यार्थ्यांच्या नामपट्ट्या तयार करायला एखादा आठवडा लागेल.) विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्राचे नाव विचारून ते चित्राखाली लिहिणे. गटाची चित्रे नावासहित एका वहीत चिकटवायला सांगून त्या वहीवर गटाचे नाव लिहिणे. | आपल्या गटातील रंगविलेल्या चित्रांची नावे लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करणे. रोज आपल्या, मित्राच्या व मैत्रिणीच्या तसेच त्यांनी काढलेल्या चित्राच्या नावांचे पाच ते सहा वेळा वाचन करणे. | – | – | – | – |
| | वर्गातील वस्तू आणि त्यांची नावे दाखवून पाच पाच वेळा म्हणवून घेणे. | शिक्षिकांच्या सूचनेनुसार वस्तूची नामपट्टी त्या त्या वस्तूवर चिकटविणे व वाचून दाखविणे. | शब्दआकारातील महत्वाचे फरक लक्षात येतात. | – | वर्गातील वस्तूंची नावे वाचतात. | तोंडी चाचणी (नामपट्ट्याचे वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| चित्र–शब्दपट्ट्या | 'चित्रे ओळखा' खेळाबद्दल प्रात्यक्षिकासह माहिती सांगणे. गटात नामपट्ट्या असलेली चित्रे वाटणे व चित्राबरोबर त्याखालील नाव सुद्धा लक्षात ठेवण्यासंबंधी सूचना देणे. पुढे केवळ नावे दाखवून ती ओळखून घेणे. | खेळाबद्दलची माहिती लक्षपूर्वक ऐकणे, प्रात्यक्षिकाचे निरीक्षण करणे. गटात आळीपाळीने चित्रे ओळखण्याचा आणि त्यांची नावे लक्षात ठेवण्याचा खेळ खेळणे. चित्रांवरील नावे वेगळी काढली असता तीही वाचणे. | शब्दआकारातील महत्त्वाचे फरक लक्षात येतात. | – | चित्रांशिवाय दाखविलेली त्यांची नावे ओळखू शकतात. | निरीक्षण व नोंद |
| वाक्यसाचे | फलकावर हा, ही, हे.... आहे, तो, ती, ते....आहे असे वाक्यसाचे लिहिणे. | लक्षपूर्वक निरीक्षण करणे, ऐकणे. | वाक्यांच्या रचनेची तसेच शब्दांच्या रूपात पडणाऱ्या फरकाची जाणीव होते. | वाक्ये तयार करता आली याचा आनंद होतो. | घरी व मित्रांना वाक्ये म्हणून दाखवितात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | नंतर काही विद्यार्थ्यांना जवळ बोलावून अथवा दूरच्या विद्यार्थ्यांचा अथवा वर्गातील वस्तूंचा निर्देश करून ती वाक्ये म्हणणे.<br>गटात विद्यार्थ्यांना प्रथम तोंडी सराव करण्यास सांगणे.<br>नंतर वाक्यसाच्यांच्या पट्ट्या देऊन रिकाम्या जागेत त्यांच्या व वस्तूंच्या नावांच्या पट्ट्या ठेवून वाक्ये वाचण्याचा सराव करणे. | गटात प्रथम तोंडी व नंतर नामपट्ट्या आणि वाक्यसाचे यांच्या साहाय्याने वाक्य वाचनाचा सराव करणे. | | वाक्ये वाचता आली याचा अभिमान वाटतो. | वाक्यसाचे पाहून वाक्ये अचूक सांगतात. | |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| गोष्टी | चित्रे, कटआऊटस् किंवा बाहुलीनाट्य यांच्या मदतीने आणि हावभाव करून छोट्या गोष्टी गटात सांगणे. विद्यार्थ्यांनी माध्यमभाषेत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीतच देणे. | गोष्ट लक्षपूर्वक ऐकणे, जो भाग समजला नसेल त्याबद्दल माध्यमभाषेत प्रश्न विचारणे. नंतर मराठीत गोष्टी सांगण्याचा गटात सराव करणे. | गोष्टीतील आशय, वाक्यरचना यांची जाणीव होते. | गटाने गोष्टी सांगण्याच्या उपक्रमात सहभागी झाल्याचा आनंद होतो. | वर्गात, घरी तसेच मित्रांना गोष्टी सांगतात. | तोंडी चाचणी (गोष्ट सांगणे) |
| स्व–परिचय | स्वतःचा परिचय केव्हा व कसा करून द्यायचा ते स्वतःच्या उदाहरणाने स्पष्ट करणे, जसे स्वतःचे नाव, शाळेचे नाव, शिकवीत | लक्षपूर्वक ऐकणे, समजून घेणे. गटात स्वतःचा परिचय करून देणे, जसे स्वतःचे नाव, शाळेचे नाव आणि आपला वर्ग सांगणे. | स्वपरिचय करून देताना काय–काय व का सांगायचे ते समजते. परिचयात कोणते तपशील सांगायचे ते लक्षात येते. | मराठीतून स्व–परिचय करून देता आल्याचे समाधान वाटते. | घरी आलेल्या पाहुण्यांना स्वतःचा मराठीतून परिचय करून देतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | असलेल्या वर्गाचे नाव. तसेच एका विद्यार्थ्याचे प्रात्यक्षिक घेऊन गटात प्रत्येकाचा स्व–परिचय करवून घेणे. | | | | | |
| माझे कुटुंब | फोटो, कुटुंबवृक्षाची आकृती यांच्या मदतीने आपल्या स्वतःच्या कुटुंबाचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे. नावांना व फोटोंना जागा सोडलेल्या मजकुराची कार्डे विद्यार्थ्यांना वाटणे व भरून आणण्यास सांगणे. | लक्षपूर्वक निरीक्षण करणे, ऐकणे.<br>जाणकार व्यक्तींकडून नावे लिहून घेऊन व फोटो चिकटवून घेऊन कार्ड तयार करणे, वाचनाचा सराव करणे. | स्वतःच्या कुटुंबाचे चित्र डोळ्यांसमोर येते. | आपल्या कुटुंबाबद्दलची आपुलकीची भावना जागी होते. | वर्गात आपले कार्ड वाचून दाखवतात. | तोंडी चाचणी (कुटुंब परिचय) |